॥ श्रावणात घननिळा बरसला ॥

गायिकाः लता मंगेश्कर
गीतः मंगेश पाडगावकर
संगीतः श्रीनिवास खळे

श्रावणात घननिळा बरसला, रिमझिम रेशिम धारा।
उलगडला झाडातुन अवचित, हिरवा मोर पिसारा ॥ धृ. ॥

जागुन ज्याची वाट पाहिली, ते सुख आले दारी।
जिथे तिथे राधेला भेटे, आता श्याम मुरारी॥
माझ्याही ओठावर आले, नाव तुझेच उदारा ॥ १ ॥

रंगांच्या रानात हरवले, हे स्वप्नांचे पक्षी।
निळ्या रेशमी पाण्यवरती, थेंब बावरी नक्षी॥
गत जन्मीची ओळख सांगत, आला गंधित वारा ॥ २ ॥

पाचूच्या हिरव्या माहेरी, ऊन हळदीचे आले।
माझ्या भाळावर थेंबांचे, फूल पाखरू झाले॥
मातीच्य गंधाने भरला, गगनाचा गाभारा ॥ ३ ॥

पानोपानी शुभ शकुनाच्या, कोमल ओल्या रेशा।
अश्या प्रितीचा नाद अनाहत, शब्दांवाचुन भाषा॥
अंतरयामी सूर गवसला, नाही आज किनारा ॥ ४ ॥